माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ८५९/२०२१**

**अपिलार्थी, श्री. उमेश दमडूजी फुलमाळी ,**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्राम पंचायत भानखेडा, ता. जि. वर्धा

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कृषी विस्तार अधिकारी,**
पंचायत समिती, वर्धा, ता. जि. वर्धा

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.०१.२०२३**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.१२.२०२० | निरंक | २८.०१.२०२१ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०३.१२.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी “ 1) भाऊराव झिबल चौके २) दिगंबर नामदेव वानखेडे ३) पांडूरंग श्रावण गायकवाड ४) सुनील मधुकर बाभुळकर यांचा नमुना ८ विषयी माहिती मिळण्याबाबत, याविषयी माहिती मागीतलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक निरंक व्दारे 1) भाऊराव झिबल चौके २) दिगंबर नामदेव वानखेडे ३) पांडूरंग श्रावण गायकवाड ४) सुनील मधुकर बाभुळकर यांचा नमुना ८ मागीतला असल्यामुळे वरील खातेदारांनी कलम ७ अन्वये आपला नमुना ८ द्यावा, की नाही याबाबत ग्रामपंचायतने हरकत घेतली असता वरील सर्व खातेदारांनी लेखी दिले की, आमच्या घराचा नमुना ८ अ देण्यात येऊ नये. त्यामुळे आपणास नमुना ८ अ ची प्रत देता येणार नाही, असे अपिलार्थीस कळविले. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २८.०१.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे “अर्ज फेटाळल्यामुळे” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणत्याही प्रकारची सुनावणी घेवून आदेश पारित केल्याचे आढळून येत नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २५.०३.२०२१** रोजी " अर्ज फेटाळणे, अपिल निकाली न काढणे." असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक ०४.०१.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत भानखेडा ता. जि. वर्धा, कु.एस.बी.बोरकर उपस्थित आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी कृषी पंचायत समिती वर्धा, श्री. पी.बी. परांजपे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी श्री. फुलमाळी यांनी सादर केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ११(१) खाली वरील माहिती उघड करावी किंवा कसे याबाबत संबंधितांना विचारणा केली असता, ४ ही गैरअर्जदार यांनी अपिलार्थी यांनी नमुना-८ ची माहिती मागितलेली असल्यामुळे वरील माहिती प्रदान करण्यात येवू नये, असे सुचीत केले आहे. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी कलम ८(१)ञ नुसार मागितलेली माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे देण्यास नकार दिलेला आहे. त्याविरुध्द अपिलार्थी यांनी प्रथम अपील अर्ज दाखल केलेला आहे. त्यानंतर व्दितीय अपील अर्ज दाखल करीत माहिती प्रदान करण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे. सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही सामान्य स्वरुपाची असल्यामुळे त्यात वैयक्तिक स्वरुपाचा कोणताही तपशिल नसल्यामुळे व त्यात खाजगीपणाच्या हक्कावर कोणतेही आंगतुक हस्तक्षेप करेल, असे काहीही नसल्यामुळे ती माहिती अपिलार्थीस देणे अपेक्षित आहे. त्यानुसार आज सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती आयोगासमोर आणलेली असून ती देण्याची तयारी सुध्दा दर्शविलेली आहे. सदर बाब लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र-अ च्या अनुषंगाने संपूर्ण माहिती अपिलार्थीस तात्काळ विनामुल्य प्रदान करण्यात यावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी, या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधीन राहून, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०४.०१.२०२३**

जावक क्रमांक ---4097--- दिनांक ---30 JUN 2023---